# अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

## महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१ (१) नुसार मा.स्थायी समिती सभापती निवडीच्या सभेचे इतिवृत्त.

--*--

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१ (१) तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका ( स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम २००७ तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम ( स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) ( सुधारणा ) नियम २००८ चे तरतूदी नुसार मा.स्थायी समिती सभापती पदावर सभापतींची निवड करणे साठी दिनांक ०४-०३-२०१५ रोजी बोलाविलेल्या विशेष सभेचे इतिवृत्त.

--*--

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१ (१) तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका ( स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम २००७ तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम ( स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) ( सुधारणा ) नियम २००८ अन्वये मा.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडील आदेश क्र.नपा/१/२/ जा.क्र. ८०५८/ २०१५ दिनांक २१/०२/२०१५ रोजीचे पत्रान्वये बुधवार दिनांक ०४-०३-२०१५ रोजी सकाळी ११.०० वाजता स्थायी समिती सभापती पदाच्या निवडीसाठी होणा-या सभेकरीता मा.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांनी पिठासीन अधिकारी म्हणून मा.श्री.अनिल कवडे, जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना प्राधिकृत केले. त्या अनुषंगाने मा.स्थायी समिती सभापती पदावर सभापतीची निवड करणेकामी बोलविण्यात आलेली मा.स्थायी समिती सभा बुधवार दिनांक ०४/०३/२०१५ रोजी सकाळी ११.०० वाजता अहमदनगर महानगरपालिकेच्या नविन प्रशासकीय इमारतीमधील स्थायी समिती सभागृहात सुरू झाली त्यावेळी मा.श्री.अनिल कवडे, जिल्हाधिकारी, अहमदनगर हे पिठासीन अधिकारी म्हणून तर खालील प्रमाणे मा.स्थायी समिती सदस्य उपस्थित होते.

| अ.नं. | सदस्याचे नांव |
|---|---|
| १ | मा.श्री. संपत विजय बारस्कर |
| २ | मा.श्रीमती मंगल सतिष गुंदेचा |
| ३ | मा.श्री. अजिंक्य सुधाकर बोरकर |
| ४ | मा.श्री. कुमार बबनराव वाकळे |
| ५ | मा.सौ. सुनिता महेंद्र कांबळे |
| ६ | मा.श्री. सचिन तुकाराम जाधव |
| ७ | मा.सौ. उषा शरद ठाणगे |
| ८ | मा.श्री. दिप नारायण चव्हाण |
| ९ | मा.श्री. अनिल वसंतराव बोरूडे |
| १० | मा.सौ. छाया सुरेश तिवारी |
| ११ | मा.सौ. विद्या दिपक खैरे |
| १२ | मा.श्री. श्रीपाद शंकर छिंदम |
| १३ | मा.सौ. उषा शिवाजीराव नलवडे |
| १४ | मा.सौ. रूपाली निखील वारे |
| १५ | मा.श्री. समद वहाब खान |
| १६ | मा.श्री. गणेश पुंडलिक भोसले |

सभेच्या कामकाजास सकाळी ११.०० वा. सुरूवात करण्यात आली. सभेच्या सुरूवातीस मा.स्थायी समिती सभापती पदाच्या निवडणूकीची विषय पत्रिका सभेमध्ये वाचून दाखविण्यात आली. त्यानंतर नगरसचिव यांनी त्यांचेकडील दाखल नामनिर्देशन पत्रांचे पाकीट समक्ष उघडुन नामनिर्देशन पत्रे मा.पिठासीन अधिकारी तथा जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडेस सादर केली.

मा.स्थायी समितीच्या सभापतीसाठी एकुण ३ उमेदवारांची नगरसचिव यांचेकडे विहीत मुदतीत दाखल झालेली तीन (३) नामनिर्देशन पत्रे मा.पिठासीन अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांचेकडे सुपुर्द करण्यात आली. मा.पिठासीन अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांनी ही माहिती उपस्थित सदस्यांना दिली. दाखल झालेले नामनिर्देशन पत्र खालील प्रमाणे.

१) सौ.छाया सुरेश तिवारी
२) श्री.गणेश पुंडलिक भोसले
३) सौ.उषा शरद ठाणगे

दाखल झालेल्या नामनिर्देशन पत्राची सकाळी ११.१० वा.छाननी सुरू करण्यात आली.

प्रथमतः १) उमेदवार सौ.छाया सुरेश तिवारी ह्या स्थायी समिती सदस्य असुन त्यांची उमेदवारी फॉर्मवर स्वाक्षरी आहे. तसेच सुचक व अनुमोदक हे स्थायी समिती सदस्य असुन त्यांची देखील उमेदवारी फॉर्मवर स्वाक्षरी आहे. त्यांचा अर्ज मंजूर करणेंत आला.

२) उमेदवार श्री.गणेश पुंडलिक भोसले हे स्थायी समिती सदस्य असुन त्यांची उमेदवारी फॉर्मवर स्वाक्षरी आहे. तसेच सुचक व अनुमोदक हे स्थायी समिती सदस्य असुन त्यांची देखील उमेदवारी फॉर्मवर स्वाक्षरी आहे. श्री.गणेश पुंडलिक भोसले यांचा अर्ज मंजूर करण्यांत आला.

३) उमेदवार सौ.उषा शरद ठाणगे ह्या स्थायी समिती सदस्य असुन त्यांची उमेदवारी फॉर्मवर स्वाक्षरी आहे. तसेच सुचक व अनुमोदक हे स्थायी समिती सदस्य असुन त्यांची देखील उमेदवारी फॉर्मवर स्वाक्षरी आहे. सौ.उषा शरद ठाणगे यांचा अर्ज मंजूर करण्यांत आला.

नामनिर्देशन पत्राची छाननी झाल्यानंतर सौ.छाया सुरेश तिवारी, श्री.गणेश पुंडलिक भोसले व सौ.उषा शरद ठाणगे यांचे उमेदवारी अर्ज वैध असल्याची घोषणा करुन सकाळी ११.१० ते सकाळी ११.२५ वाजेपर्यंत वैध अर्जांपैकी ज्यांना उमेदवारी अर्ज मागे घ्यावयाची आहे, त्यांचेसाठी १५ मिनिटांची वेळ देणेत आली.

माघारीसाठीच्या विहीत मुदतीत सौ.छाया सुरेश तिवारी यांनी आपला उमेदवारी अर्ज माघारी घेतला. सकाळी ११.२५ वाजताची वेळ संपल्यानंतर स्थायी समिती सभापती पदाच्या निवडणूकीसाठी अंतिमतः १) श्री.गणेश पुंडलिक भोसले २) सौ.उषा शरद ठाणगे या दोन उमेदवारांचे अर्ज शिल्लक राहिले. सदर उमेदवारांची नांवे आडनांवाच्या मराठी वर्णानुक्रमानुसार लावण्यात आली. ती खालील प्रमाणे.

१. सौ.उषा शरद ठाणगे
२. श्री.गणेश पुंडलिक भोसले.

यानंतर मतदान प्रक्रीया सुरु करण्यांत येत असुन उमेदवाराचे नांव पुकारल्या नंतर त्या उमेदवारास मत देवू इच्छिणा-या सदस्याने हात वर करुन तसेच मतगणका कडील पत्रिकेमध्ये आपल्या नावाची नोंद करुन व स्वाक्षरी करुन आपल्या मताची नोंद करावी. एकदा मतपत्रिकेवर स्वाक्षरी करुन मतदान केल्यानंतर पुन्हा मतदान बदलता येणार नाही. अशा सूचना देण्यांत आल्या.

उमेदवारांच्या यादीनुसार प्रथमतः सौ.उषा शरद ठाणगे यांचे नांव पुकारण्यात येत असुन ज्या सदस्यांना त्यांचे बाजुने मतदान करावयाचे आहे त्या सदस्यांनी आपला हात वर करावा व मतदान पत्रिकेवर आपले स्वतःचे नांव टाकुन स्वाक्षरी करावी. असे पिठासीन अधिकारी यांनी सूचविले. त्यानुसार अनुक्रमे सौ.उषा शरद ठाणगे यांच्या बाजुने एकुण उपस्थित सदस्यांपैकी खालील सदस्यांनी मतदान केले.

| अ.नं. | सदस्याचे नांव |
|---|---|
| १ | सौ.उषा शरद ठाणगे |
| २ | सौ.उषा शिवाजीराव नलावडे |
| ३ | सौ.विद्या दिपक खैरे |
| ४ | सौ.छाया सुरेश तिवारी |
| ५ | श्री.सचिन तुकाराम जाधव |
| ६ | श्री.अनिल वसंतराव बोरुडे |
| ७ | श्री.श्रीपाद शंकर छिंदम |
| ८ | श्री.दिप नारायण चव्हाण |

उमेदवारांच्या यादीनुसार दुसरे उमेदवार श्री.गणेश पुंडलिक भोसले यांचे नांव पुकारण्यात येवुन त्यांचे बाजुने ज्या सदस्यांना मतदान करावयाचे त्या सदस्यांनी आपला हात वर करून मतदान करणेबाबत पिठासीन अधिकारी यांनी सूचविले. त्यानुसार श्री.गणेश पुंडलिक भोसले यांच्या बाजुने एकुण उपस्थित सदस्यांपैकी खालील सदस्यांनी मतदान केले. सदर सदस्यांची नांवे खालील प्रमाणे.

| अ.नं. | सदस्याचे नांव |
|---|---|
| १ | श्री.गणेश पुंडलिक भोसले |
| २ | श्री.कुमार बबनराव वाकळे |
| ३ | श्री.समद वहाब खान |
| ४ | श्री.अजिंक्य सुधाकर बोरकर |
| ५ | श्री.संपत विजय बारस्कर |
| ६ | सौ.रुपाली निखिल वारे |
| ७ | सौ.सुनिता महेंद्र कांबळे |
| ८ | श्रीमती.मंगला सतिष गुंदेचा |

पिठासीन अधिकारी यांनी अहमदनगर महानगरपालिका स्थायी समिती सभापती पदासाठी झालेल्या मतदानाची आकडेवारी जाहीर केली.

सौ.उषा शरद ठाणगे यांना मिळालेली मते ८ आहेत. व श्री.गणेश पुंडलिक भोसले यांना मिळालेली मते ८ आहेत.

दोनही उमेदवारांना समसमान मत पडल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे चिठ्ठी टाकुन सभापती निवड करण्यांत येईल. सर्वानुमते कोणाच्या हस्ते चिठ्ठी उचलायची ते ठरवू. शालेय विद्यार्थ्यांच्या हस्ते चिठ्ठी काढण्यास सर्वांची संमती असेल तर त्याच्या हस्ते चिठ्ठी काढण्यात येईल. सर्व सदस्यांनी यास संमती दर्शविली. सर्वांसमक्ष दोन चिठ्ठया दाखविण्यांत आल्या. पहिली चिठ्ठी सौ.उषा शरद ठाणगे यांची आहे. त्यावर पिठासीन अधिकारी यांची स्वाक्षरी आहे. दुसरी चिठ्ठी श्री.गणेश पुंडलिक भोसले यांची आहे. त्यावर पिठासीन अधिकारी यांची स्वाक्षरी आहे. दोनही चिठ्या सर्वांसमक्ष घडी घालुन पारदर्शक बरणीमध्ये टाकण्यांत आल्या व बरणी हलविण्यांत आली.

यानंतर शालेय विद्यार्थी कु.आकाश कांबळे याच्या हस्ते एक चिठ्ठी काढण्यांत आली. ती **श्री.गणेश पुंडलिक भोसले** यांची निघाली.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१ (१) तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका ( स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम २००७ तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम ( स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) ( सुधारणा ) नियम २००८ नियम अन्वये अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे सभापती म्हणुन **''श्री.गणेश पुंडलिक भोसले''** हे निवडुन आल्याचे पिठासीन अधिकारी तथा जिल्हाधिकारी अहमदनगर यांनी घोषीत केले व त्यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे जाहीर केले.

सही /-
पिठासीन अधिकारी तथा जिल्हाधिकारी,
स्थायी समिती सभापती निवड-२०१५.
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर
दिनांक : ०४-०३-२०१५.